*चंद्रपूर जिल्ह्यात स्वीट क्रांतीला होणार सुरुवात*

*पोभुर्णामध्ये पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने*

*मधुमक्षिका पालन प्रशिक्षण व मध पेटीवाटप कार्यक्रम*

==========================================

चंद्रपूर दि.5 जानेवारी : चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने व त्यांना आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी राज्याचे वित्त, नियोजन व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चालू असलेल्या अभियानाअंतर्गत 6 जानेवारी रोजी पोंभूर्णा येथे मधुमक्षिका पालन व प्रशिक्षण मधपेटी वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ होत आहे. या कार्यक्रमासोबतच चंद्रपूर जिल्ह्यात स्वीट क्रांतीला सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग चंद्रपूर व समर्थ वूमेन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होत आहे. केंद्र शासनाने शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ व आर्थिक स्तर वाढवण्याला गती देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यामध्ये पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन सोबतच मधुमक्षिका पालनाच्या उद्योगाला देखील चालना दिली जात आहे. मधूमक्षिका पालनाच्या माध्यमातून स्वीट क्रांती देशात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या स्वीट क्रांतीचा पहिला प्रयोग चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पोभूर्णा येथे होत आहे. मधुमक्षिका, कृषी उद्योग जागरूकता अभियान प्रशिक्षण व मध पेटी वाटपाचा प्रमुख कार्यक्रम उद्या पोंभुर्णा येथे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी इको पार्कमध्ये होत आहे. उद्या सकाळी 11 ते दुपारी 1 या दरम्यान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रत्नागिरीचे माजी आमदार बाळ माने तसेच समर्थ वूमेन्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्षा, उद्योजिका राजश्री विश्वासराव यांच्या उपस्थित उद्या सकाळी 11 वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे.